महाराष्ट्र शासन
# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खु.) ता.आंबेगाव जि.पुणे – 412 405

दूरध्वनी क्र. 02133 – 225900
फॅक्स क्र. 02133 – 225901

ई–मेल - gcoeara@gmail.com
वेबसाईट : www.gcoeara.ac.in

जा.क्र.शाअसंमअ / स.सा. / 2024 / 1617

दि. 04 JUN 2024 / 2024

प्रति,

Prof. R.P.Bagwade / Mr.A. D. Chavan
यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

**विषय : कंत्राटी तत्वावर वीजतंत्री आणि तारतंत्री (Electrician & Wiremen) कर्मचारी पुरवठा करणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत नमूद करण्यात येते की, संस्थेमध्ये एक वीजतंत्री आणि एक तारतंत्री (एस.एस.सी. उत्तीर्ण, आय.टी.आय. वीजतंत्री / तारतंत्री ट्रेड उत्तीर्ण अथवा डिप्लोमा / पदवी (विद्युत) कर्मचारी कंत्राटी तत्वावर घेणेचा आहे. त्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदरची निविदा संस्थेत दि. 26 / 06 / 2024 पर्यंत पाठविण्यात यावी. कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन व इतर लाभ (Provident fund, ESIC) शासन नियमानूसार वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील व त्यासंबंधातील पृष्ठ्यार्थ कागदपत्रे नियमित संस्थेत जमा करावी लागणार आहे.

निविदा सादर करतेवेळी, संस्थेमार्फत किमान वेतन कायद्यास अनुसरून रू.16000 / – (अक्षरी–रू.सोळा हजार फक्त) मुळवेतन अधिक कंत्राटदाराचे सर्व्हीस चॉर्जेस (रूपयांमध्ये) अधिक 18% GST असे एकुण येणारी रक्कम याप्रमाणे निविदा विहीत मुदतीत संस्थेस मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी खु. ता.आंबेगाव जि.पुणे–412 405 यांच्या नावे सादर करण्यात यावी.

निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र PF, ESIC, GST, Pan Card तसेच सदर कंत्राटा संबंधातील अनुभव प्रमाणपत्रे इत्यादी नोंदणी असलेल्या प्रमाणपत्रांची प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच निविदेत काही अडचणी निदर्शनास आल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.प्राचार्य यांना राहील.

ज्या कंत्राटदारास निविदा न्यूनतम दराने प्राप्त होईल त्यांनी खालील अटी व शर्तीनूसार वीजतंत्री व तारतंत्री यांची संस्थेस सेवा उपलब्ध करून द्यावी.

04-6-24

( डॉ.डी.आर.पानगव्हाणे )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन
महा.अवसरी खु. ता.आंबेगाव जि.पुणे.

नियम व अटी :

1) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री यांचे किमान वय 18 वर्ष पुर्ण झालेले असणे आवश्यक आहे.तसेच सदर विजतंत्री व तारतंत्री यांना विद्युत विषयक दुरूस्ती व देखभाल तसेच आवश्यकतेनूसार नुतनीकरण व विहीरीवरील पंप चालविणे किरकोळ दुरूस्ती आदी कामांचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच विजतंत्री,तारतंत्री यांचे सदर कामाचा अनुभव व शैक्षणिक अर्हते संबंधातील कागदपत्रे कंत्राटदाराने संस्थेत जमा करणे बंधनकारक राहील.
2) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री यांना संगणक हाताळणी व महावितरण, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग तसेच विद्युत विषयक कामा संबंधातील पत्रव्यवहार करावयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
3) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री यांनी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत (सकाळी 9.30 ते सांय 6.15 पर्यंत) संस्थेत उपस्थित रहाणे आवश्यक असेल. तसेच सदर विद्युत दुरूस्ती संबंधातील कामे अत्यावश्यक असल्यामुळे वरील नमूद वेळे वेतेरिक्त आवश्यकतेनूसार जास्तीचा कालावधी (विद्युत विषयक सेवा) देणे आवश्यक राहील. अतिरिक्त वेळेस केलेल्या कामाचे संस्थेमार्फत कोणतेही अतिरिक्त मानधन अदा केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
4) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री कर्मचारी यांना कामगार आयुक्तांच्या नियमानूसार देय असलेल्याच सुट्टी संस्थेमार्फत देण्यात येईल. परंतू सदर सुट्टी दिवशी विद्युत विषयक तातडीचे कामे आल्यास सुट्टीच्या दिवशी सेवा देणे आवश्यक राहील तसेच सुट्टी दिवशी केलेल्या कामाची पर्यायी सुट्टी देय राहणार नाही. तसेच इतर दिवशी संस्थेला सुट्टी असल्यास सदर कर्मचारी दिलेल्या नमूद वेळेत संस्थेत उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
5) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री कर्मचाऱ्यास काम सोडून जावयाचे असल्यास संस्थेस 1 महिना पुर्वी लेखी स्वरूपात कंत्राटदारामार्फत कळविणे आवश्यक राहील. तसेच संस्था सोडून जाताना संस्थेचे विद्युत विषयक आवश्यक असलेले साहित्य व संबंधीत कागदपत्रे विद्युत देखभाल दुरूस्ती समितीकडे जमा करून त्यांचे नादेय प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.
6) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री कर्मचारी वारंवार बदलण्यात येवू नये कारण यामुळे संस्थेत उद्‌भवणाऱ्या विद्युत विषयक कामामध्ये अडचण निर्माण होईल याची दक्षता घ्यावी.
7) संस्थेस पुरवण्यात येणारे कंत्राट हे केवळ आदेश निर्गमित केल्यापासून केवळ 1 वर्षाकरीता असेल.
8) सदर विजतंत्री व तारतंत्री यांना विद्युत विषयक दुरूस्ती व देखभाल तसेच आवश्यकतेनूसार नुतनीकरण व विहीरीवरील पंप चालविणे तसेच त्यासंबंधातील किरकोळ दुरूस्ती आदी कामांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
9) संस्थेच्या विहीरीवरील विद्युत पंप चालु केल्यानंतर संस्थेत उपलब्ध असलेली पाण्याची टाकी भरल्यानंतर ती विहीरीवरील पंप तातडीने बंद करण्याची तसेच संस्थेला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन गळती व त्यासंबंधातील इतर कामे ही कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्याची जबाबदारी राहील.
10) कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या विजतंत्री तथा तारतंत्री यांनी संस्थेत कामे नसल्यास त्यांनी संस्थेतील विद्युत विभागातील प्रयोगशाळेत प्रात्यक्षिके तथा प्रयोगशाळा सुस्थितीत ठेवण्यास मदत करणे बंधनकारक राहील.
11) मा.प्राचार्य व विद्युत विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेली कामे विहीत मुदतीत पुर्ण करणे व त्यासंबंधीत केलेल्या कामाचा अहवाल विद्युत विभाग प्रमुख यांना सादर करणे त्यासाठी दररोजचे वर्क डायरी ठेवणे.
12) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या वीजतंत्री व तारतंत्री कर्मचारी यांना काम करतेवेळी काही अपघात/दुर्घटना घडल्यास त्यास संस्था कुठल्याही प्रकारे जबाबदार राहनार नाही. तसेच सदर कर्मचाऱ्याने गैरवर्तन केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.
13) वरील सर्व नियम व अटी मान्य असल्याबाबतचे हमीपत्र कंत्राटदाराने संस्थेस रू.100/–च्या स्टॅम्प पेपरवर लिहून देणे बंधनकारक राहील.

04-6-24

( डॉ.डी.आर.पानगव्हाणे )
प्र. प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन
महा.अवसरी खु. ता.आंबेगाव जि.पुणे.